# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/08/2023 (शुक्रवार) दुपार


---

## घरफोडी

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत मौजा मोवाड पांढुर्णा रोड पहेलवान शहा दरबार येथे दिनांक ०२/०८/२०२३ चे २०.३८ वा. ते दिनांक ०३/०८/२०२३ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रेम गंगाधरजी खडसे, वय ३० वर्षे, रा. मोवाड हे मौजा मोवाड पांढुर्णा रोड पहेलवान शहा दरबार बंद करून घरी गेले असता व दुसऱ्या दिवशी परत येवुन दरबार उघडण्याकरीता गेले असता दरबारच्या कंपाउंडचे कुलूप उघडले व आत मध्ये गेले असता ज्या खोलीत मदार आहे तेथे दानपेटी आहे त्या खोलीचे कुलुप तुटलेले दिसले आत डोकावुन पाहिले तर दानपेटी फुटलेली दिसली व दानपेटी मधील अंदाजे १४०००/–रू. ते १५०००/– रू. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रेमराज सनेसर मो. नं. ९६७३४०४९०७ हे करीत आहे.

## चोरी

१) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत १३ कि. मी. अंतरावरील मौजा खैरी महार येथे दिनांक ०१/०८/२०२३ चे १८.०० वा. ते दिनांक ०२/०८/२०२३ चे १०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– श्रीकांत देवकुमार सामृतवार, वय ४१ वर्ष, रा.हुवाटर कोंढाळी यांचे खैरी शिवारातील २४००० मीटर लांब ॲल्युमीनीअमचा तार अंदाजे किमंती ५००००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार बाबूलाल राठोड ब. नं. ६२१ मो. नं ७७९८३४४९१९ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा घुबडी शिवार येथे दिनांक २७/०७/२०२३ चे १२. ०० वा. सुमारास फिर्यादी नामे– पवन सुधाकरराव मोरे, वय ३५ वर्ष, रा. दलतपुर ता. आष्टी जि. वर्धा यांचे घुबडी शिवारातील मोबाईल टावरच्या अमरराजा कंपनीच्या २४ बॅटऱ्या किमंती अंदाजे २४,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुनील बनसोड ब. नं. १५६४ मो. नं ९४०३८३०२३० हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर